शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | २१ सप्टेंबर १९९२ | अंक १२ वा

# दूध : सहकार विरुद्ध शेतकरी

— शरद जोशी

आपल्या मालाला गिऱ्हाईक मिळू नये म्हणू कोणी उत्पादक प्रयत्न करील काय? उघड उघड अशक्य वाटणारी ही गोष्ट प्रत्यक्षात होत आहे.

**सहकाराचा खाजगीकरणास विरोध**

काही दिवसांपूर्वी कऱ्हाड येथे पश्चिम महाराष्ट्रातील दूध सहकारी सोसायट्यांच्या पुढाऱ्यांची बैठक झाली. त्यांनी महत्त्वाचा ठराव केला तो हा की सरकारने कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यवसायाला दुधाच्या क्षेत्रात उतरू देऊ नये. भले दुधाची मागणी कमी राहिली तरी चालेल, पण दुधाचा सगळा कारभार सहकारी संस्थांच्या हातीच राहिला पाहिजे.

दिल्ली येथे भरलेल्या अखिल भारतीय सहकारी दूध संस्थांच्या संघटनेच्या एका बैठकीने या पुढे जाऊन, खाजगी कंपन्यांना दुधाच्या क्षेत्रात प्रवेश दिल्यास मोठे आंदोलन उभे करण्याची घोषणा केली आहे.

**सहकाराचा शेतकरीविरोध**

दुधाला भाव मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी जेंव्हा जेंव्हा आंदोलन केले तेव्हा तेव्हा ते आंदोलन या सहकारी संस्थानी हाणून पाडायचा प्रयत्न केला. गिऱ्हाईकांचे, विशेषतः लहान बाळांचे, गर्भवती स्त्रियांचे दूध तुटता कामा नये असा कांगावा शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या वेळी करणारी ही मंडळी दुधाच्या क्षेत्रात खाजगी व्यवसायाचे पदार्पण होऊन शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळतील असे दिसताच बालकांचे आणि त्यांच्या आयांचे दूध तोडायला तयार झाली आहेत.

हे सगळे काय गौडबंगाल आहे?

**केंद्र शासनातील चमत्कार**

दुधासंबंधी केंद्र शासनाने 'जीवनावश्यक वस्तू कायद्या' खाली एक नवीन वटहुकूम काढला आहे. या वटहुकुमाचा तपशील सोडल्यास मुख्य हेतू खाजगी क्षेत्रातील भांडवल दुधावरील प्रक्रियेच्या व्यवसायात उतरू न देणे असा आहे. या वटहुकुमाविरूद्ध सुप्रीम कोर्टात एक अर्ज दाखल करण्यात आला आहे. अहो आश्चर्यम्! केंद्रीय शेतकी मंत्रालयाने या प्रकरणी वटहुकुमाचे समर्थन केले आहे; या उलट, अन्न प्रक्रिया मंत्रालयाने विरोधी भूमिका घेतली आहे. म्हणजे, कोर्टासमोरील एका दाव्यात केंद्र शासनाची दोन मंत्रालये एकमेकांविरुद्ध ठाकली आहेत.

हाही काय चमत्कार आहे?

**यूरोपातील उरल्यासुरल्यावर भारतात महापूर**

८६ कोटी लोकवस्तीच्या या देशात दुधाचे एकूण उत्पादन ५ कोटी टन आहे. यापैकी फक्त ७५ लाख टन व्यापारात उतरते. खाजगी क्षेत्राचा वाटा १५ लाख टनांचा आणि उरलेल्यापैकी २५ लाख टन डॉ. कूरियन यांच्या राष्ट्रीय दुग्धव्यवसाय विकास मंडळाच्या (NDDB) ताब्यात आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात शहरांची वाढ झपाट्याने होऊ लागली आणि तेथील वाढत्या लोकसंख्येला दुधाचा पुरवठा कसा करायचा ही मोठी समस्या तयार झाली. दोन चार जागी 'आरे कॉलनी' च्या धर्तीवर दुधाचे उत्पादन स्वतःच करण्याचा प्रयत्न सरकारने केला पण त्यांचा फजितवाडा झाला. डॉ. कूरियन यांच्या प्रशासनाखालील आणंद येथील दुधाच्या डेअरीचे दूध संकलन आणि वितरण यांचे काम एका पंतप्रधानांना पसंत पडले आणि त्याच पद्धतीवर देशभरच्या शहरांना दूधपुरवठा करण्यासाठी व्यवस्था करण्याचा सरकारी निर्णय झाला. शेतकऱ्यांच्या दुधाला नवीन बाजारपेठ मिळवून देण्याची घोषणा झाली. त्याकरिता संकलनाची यंत्रणा, शीतकरण, निर्जंतुकीकरण आणि वाहतूक व्यवस्था यांकरिता प्रचंड भांडवलाची गरज होती. हे भांडवल उभे करण्याकरिता युरोपातील देशांकडून प्रचंड प्रमाणावर दुधाची भुकटी आणि कच्चे तूप यांच्या देणग्या मिळविण्यात आल्या. या देणग्यांचा वापर 'टोण्ड' दूध बनविण्याकरिता झाला, तसाच बाजारात विक्री करण्यासाठीही झाला. या तऱ्हेने मिळालेल्या पैशातून चकचकीत प्रक्रियाकेंद्रे उभी राहिली, दुधाची वाहतूक चालू झाली. सहकारी संस्थांनी वैद्यकीय व इतर सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे दुभती जनावरे ठेवण्यास शेतकऱ्यांना थोडे प्रोत्साहनही मिळाले.

**उत्पादनवाढ महापुरामुळे नव्हे, किंमतीमुळे**

**रासायनिक खतांच्या भाववाढीसंबंधी शेतकरी संघटनेची भूमिका पान ४ वर पहा.**

पण, थोड्याच काळात असे लक्षात आले की डॉ. कूरियन यांच्या दूध महापूर योजनेचा दूधउत्पादनावर काही विशेष परिणाम झाला नाही. उलट, परदेशातील दुधाची भुकटी व कच्चे तूप देशातील बाजारात उतरल्यामुळे दुधाची किंमत कमी राहिली आणि दूधउत्पादन करणे शेतकऱ्यांना परवडेनासे झाले. दुधाच्या उत्पादनात प्रचंड झेप घेतली ती गुजरातने नव्हे, महाराष्ट्राने. सुपीक गुजरातपेक्षा दगडांचा महाराष्ट्र देश दूधउत्पादनात पुढे गेला याचे कारण महाराष्ट्रात शेतकरी आंदोलनामुळे दुधाला जास्त आकर्षक किंमती मिळू लागल्या.

हळू हळू दूधपुरवठ्याची परिस्थिती सुधारत गेली. म्हणजे, भारतीयांचे दरडोई दुधाच्या वापराचे प्रमाण काही फार चांगले झाले आहे असे नाही, पण दूध विकत घेण्यासाठी ज्यांच्याकडे क्रयशक्ती आहे त्यांना पैसा असून दूध मिळत नाही अशी परिस्थिती राहिली नाही.

१९७३ ते १९८६ या काळात दुधाचे उत्पादन, संकलन सर्व देशात मिळून प्रती वर्षी सरासरी सहा टक्क्यांनी वाढले. महाराष्ट्रातली वाढीची ही गती प्रतीवर्षी दहा टक्के होती, तर दूध महापूर योजनेच्या अड्ड्यात म्हणजे गुजरातमध्ये ही गती सर्वांत कमी म्हणजे केवळ साडेचार टक्के होती. दूध महापूर योजना आणि सहकारी संस्था दूध उत्पादनातील वाढीचे श्रेय लाटू पाहात आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की दूधउत्पादन खचवल्याचे पाप त्यांच्या माथी आहे.

हळू हळू दूधपुरवठ्याची परिस्थिती सुधारत गेली. म्हणजे, भारतीयांचे दर डोई दुधाच्या वापराचे प्रमाण काही फार चांगले आहे असे नाही, पण दूध विकत घेण्यासाठी ज्यांच्याकडे क्रयशक्ती आहे त्यांना पैसा असून दूध मिळत नाही अशी परिस्थिती राहिली नाही.

## दुधाचा ओघ शहराकडे

दूध हे कष्टाच्या शरीराला, वाढत्या वयात किंवा पोषणाची गरज असलेल्यांना उत्कृष्ट अन्न आहे. या उलट, ज्यांचे जीवनमान उंचावलेले आहे त्यांची दुधाची आवश्यकता कमी होत जाते. दूध महापूर योजनेचा परिणाम असा झाला की ज्यांना दुधाची खरी गरज होती ते दोन पैसे मिळतील या आशेने कमी गरज असलेल्यांकडे दूध पाठवू लागले. ग्रामीण भागात दूध महापूर योजनेने नळ्या खुपसून तेथील अन्नातील सर्वांत पोषक अंश काढून नेण्याची व्यवस्था केली. डॉ. कूरियन स्पष्टपणेच म्हणाले, ''दूध म्हणजे महाग प्रथिने आहेत. शेतकऱ्यांनी ती शहरांत पाठवावी आणि स्वतःची प्रथिनांची गरज डाळींनी भागवावी.''

## प्रक्रियेची चढती कमान

दुधाच्या मुबलकतेबरोबर एक नवीन बदल घडून आला. जागोजाग दुधावर प्रक्रिया करून त्याचे आकर्षक, आधुनिक खाद्यपदार्थ बनवून शहरातील पश्चिमी ढगांच्या ग्राहकांना ते पुरविण्याचा व्यवसाय सुरू झाला. खवा, खव्याची मिठाई, पनीर, चीज अशा पायरी पायरीने जाता जाता आईस्क्रीम, श्रीखंड, चॉकलेट इत्यादी पदार्थांनी बाजार गजबजू लागले. दिल्लीसारख्या शहरात पंचवीसपंचवीस, तीसतीस स्वादांचे आईस्क्रीम पुरवणारे मोठे व्यवसाय अगदी थोड्या काळात भरभराटीला आले. दुधावर प्रक्रिया करण्याच्या क्षेत्रात नवीन भांडवल उतरेल, अगदी बहुराष्ट्रीय कंपन्याही उतरतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. आज दुधावर प्रक्रिया करण्याचे उद्योगधंदे चालू करण्याकरिता खाजगी क्षेत्रातून पाचशेवर प्रस्ताव आलेले आहेत.

## सहकाराचा कांगावखोर युक्तिवाद

गावात तयार होणाऱ्या दुधाला समान्तर आणि पर्यायी मागणी तयार होते आहे हे पाहिल्यावर डॉ. कूरियन यांचे सहकारी चेले गडबडून गेले. आपण शेतकऱ्यांचे हितकर्ते आहोत, त्यांच्या दुधाला बाजारपेठ मिळवून देणे हे आपले जिवितकार्य आहे हा आव त्यांनी झटकन टाकून दिला आणि खाजगी कंपन्यांना दूध गोळा करण्याची परवानगी असता नये अशी मागणी आपले सर्व राजकीय वजन वापरून केली. या मागणीच्या पाठपुराव्यासाठी त्यांनी दोन युक्तिवाद केले.

पहिला युक्तिवाद हा की, दुधाचे उत्पादन वाढविण्याचे श्रेय सहकारी संस्थांचे आहे; त्यासाठी त्यांनी कष्ट केले आहेत, यंत्रणा उभारली आहे. या सर्व खटाटोपाचा फायदा खाजगी कंपन्यांना फुकटाफुकटी मिळता कामा नये.

खेरीज, खाजगी क्षेत्राचा प्रवेश सहकारी संस्थांवर अन्यायकारक होईल. कारण सहकारी संस्थांवर शहरांना द्रवरूपात दूध पुरविण्याची जबाबदारी आहे. खाजगी कंपन्यांवर अशी काहीच जबाबदारी नाही. त्यांना प्रक्रियेचा व्यवसाय करू दिल्यास ते दुधावरची सगळी साय खाऊन जातील आणि दूधपुरवठ्याचा आतबङ्ग्याचा व्यवसाय तेवढा सहकारी संस्थांकडे राहील.

## कृषि सल्लागार समितीची भूमिका

खाजगी क्षेत्राला 'प्रवेश निषिद्ध' करण्याची ही मागणी स्थायी कृषि सल्लागार समितीपुढे आली होती. आम्ही या मागणीविरुद्ध शिफारस केली अणि खाजगी क्षेत्राला प्रवेश द्यावा असे सांगितले. आमच्या शिफारशींचा आधार असा होता -

१) सहकारी संस्थांनी दुधाचे उत्पादन वाढविले या म्हणण्यात फारसे तथ्य नाही. दूध उत्पादनाची वाढ वितरण व्यवस्थेच्या विकासापेक्षा आकर्षक किंमतीमुळे झाली आहे;

२) दूधप्रक्रियेचा व्यवसाय अफाट फायद्याचा आहे हा युक्तिवाद शंकास्पद आहे. गुजरात राज्यातील सूरत येथील सुमूल डेअरी शेतकऱ्यांना सर्वाधिक भाव देते. तेथे प्रक्रियेचे काम होत नाही. उलट, प्रक्रिया करून चीज, श्रीखंड, चॉकलेट तयार करणारी आणंद डेअरी सुमूलइतके भाव देऊ शकत नाही; या खेरीज,

३) सहकारी क्षेत्रातील प्रक्रियाउद्योगाचे तंत्रज्ञान व यंत्रसामुग्री महागडी आहे. त्यामुळे त्या व्यवसायात मूल्यापेक्षा खर्चातच वाढ अधिक होते. खाजगी क्षेत्रातील प्रक्रिया कमी खर्चिक व अधिक कार्यक्षम असल्यामुळे तेथे शेतकरी आणि ग्राहक या दोघांचेही हित अधिक जपले जाते.

सहकारी व्यवस्थेने खाजगी क्षेत्राशी स्पर्धा करण्यास सज्ज व्हावे, आवश्यक तर शहरांना दुधाचा पुरवठा करण्याची जबाबदारी त्यांच्याकडून काढून घ्यावी अशी आमची शिफारस त्या काळच्या अनिश्चित राजकीय वातावरणात काहीही निर्णय न होता पडून राहिली.

## खुल्या अर्थव्यवस्थेची (चा)हूल.

तेवढ्यात आणखी एक महत्त्वाचा बदल घडून आला. आर्थिक अरिष्टाचा सामना करण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेचा उद्घोष झाला. सगळ्या उद्योगधंद्यावरचे परवान्याबाबतचे नियम शिथिल झाले. आणि साहजिकच दुधाचा व्यवसाय खाजगी क्षेत्राकरिता खुला झाला.

या काळात अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी मी एकदा चर्चा केली त्यावेळी त्यांनी

# नागपूर व नांदेड जिल्ह्यातील प्रचारयात्रा जोमात

शेतकरी संघटनेच्या कृतीसमितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे नांदेड व नागपूर जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांच्या वाढदिवसापासून म्हणजे ३ सप्टेंबर १९९२ पासून आपापल्या जिल्ह्यांत प्रचारयात्रा सुरू केल्या असून त्या शेतकऱ्यांना मोठ्या संख्येने आकर्षित करीत आहेत. या प्रचारयात्रांत, सध्याच्या शासनाने खुल्या अर्थव्यवस्थेची भाषा करीत जुने नेहरूधोरणच चालू ठेवले आहे त्यासंबंधीची माहिती देणे, सीताशेती, माजघर शेती व व्यापारशेतीचे महत्त्व पटवून देणे, तसेच लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाचे महत्त्व पटवून देऊन हा कार्यक्रम उत्स्फूर्तपणे अमलात आणण्यास शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे या गोष्टींवर भर देण्यात येत आहे. या सर्व गोष्टींबरोबरच, शेतकरी संघटनेचे संपर्काचे प्रमुख साधन 'शेतकरी संघटक' या पाक्षिकाचे वर्गणीदार नोंदविण्याचे अभियानही या प्रचारयात्रांत सुरू आहे.

वर्धा येथेही ३ सप्टेंबर ९२ रोजी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची व्यापक बैठक होऊन त्या बैठकीत कृतीसमितीने दिलेला कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे.

नांदेड व नागपूर जिल्ह्यातील प्रचारयात्रेतील, नेहरूनीतीच्या अन्याय्य अंमलबजावणीची माहिती मिळाल्यानंतर गावोगाव नेहरूनीतीच्या पुतळ्यांचे दहन करण्यात येत आहे. या प्रचारयात्रांचा समारोप २ ऑक्टोबर १९९२ रोजी म्हणजे महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जन्मदिनी शेतकऱ्यांचा जिल्हा मेळावा घेऊन करण्यात येणार आहे.

इतर जिल्ह्यांतील वार्ता पुढील अंकापर्यंत येतील आणि सर्वांचे संकलन शेतकरी संघटकच्या वाचकांना देता येईल अशी आशा आहे.

■ ■ ■

निःसंदिग्धपणे सांगितले, ''शहरातील ग्राहकाला पेय दूध हवे असेल तर त्यासाठी त्यांनी दुधाच्या प्रक्रियाउद्योगातील पदार्थांशी स्पर्धा केली पाहिजे.'' या त्यांच्या बोलण्यावर मी काहीसा आश्वस्त आणि निर्धास्त झालो होतो.

### नेहरूवादाचा थयथयाट

त्या नंतर पाचसहा महिन्यांतच परिस्थिती पालटू लागली. खुल्या बाजारपेठेचे धोरण औद्योगिक क्षेत्रातही माघार घेऊ लागले. आणि शेतीच्या क्षेत्रात तर अगदी सनातनी, शेतकरीविरोधी नेहरूवाद थटथयाट करू लागला. दुधाच्या क्षेत्रात केंद्रात शासनाने दोन आघाड्यांवर माघार घेतली.

### दूध प्रक्रियेवरील निर्बंध

पहिले म्हणजे, दुधाच्या क्षेत्रात खुला प्रवेश देणारे धोरण रद्द करून 'दूध आणि दुग्धजन्य पदार्थ' वटहुकूम जून १९९२ मध्ये जारी करण्यात आला. या वटहुकुमान्वये एक सल्लागार समिती तयार करण्यात आली आणि दर दिवशी १०,००० लिटरपेक्षा जास्त किंवा दर वर्षाला ५०० टनांपेक्षा जास्त, दुधातील घनपदार्थ वापरणाऱ्या उद्योगांकरिता या समितीच्या शिफारशीने नोंदणी आवश्यक करण्यात आली. थोडक्यात, खुल्या अर्थव्यवस्थेचे तत्त्वज्ञान शेतकऱ्यांना दुधाच्या बाबतीतही नाकारण्यात आले. सहकार क्षेत्रात सत्ताधारी पक्षाचे राजकीय हितसंबंध गुंतलेले आहेत, त्यांच्या बचावाकरिता हा वटहुकूम काढला गेला हे उघड आहे.

वटहुकुमातील ढोंग अगदी उघड आहे.

### वटहुकुमातील ढोंगबाजी

वटहुकुमाचा एक उद्देश, म्हणे, स्वच्छता आणि गुणवत्ता वाढवणे हा आहे. याबाबत, या दृष्टीने खरे पाहिले तर सहकारी संस्थांवरच निर्बंध यायला पाहिजेत. स्वच्छता आणि गुणवत्ता या कारणांकरिता खाजगी क्षेत्रावर बंधन घालणे उघडपणे हास्यास्पद आहे.

वटहुकुमाचा दुसरा हेतु काय तर, शेतकऱ्याला रास्त भाव मिळवून देणे. बाजारात उभी राहात असलेली मागणी छाटून टाकून दुधाला चांगला भाव मिळवून द्यायचा हे काय तर्कशास्त्र आहे?

वटहुकुमाचा खरा हेतु वटहुकुमातच स्पष्टपणे सांगितला आहे – सर्वसाधारण जनतेस शहरामध्ये दुधाचा वर्षभर स्वस्त दराने पुरवठा करणे.

### महापूर योजनेचे पुनरागमन

याखेरीज, नेहरू जमान्यातील दुसऱ्या भयानक व्यवस्थेचे पुनरुज्जीवन करण्यात आले. दूध महापूर योजनेचा तिसरा टप्पा सुरु करण्यात आला आणि गेली काही वर्षे बंद पडलेला, यूरोपातील दुधभुकटी आणि चरबी भारतात आणून दुधाचे भाव पाडण्याचा कारभार सुरू झाला. आता दरवर्षी १०० कोटी रूपयांचा माल यूरोपातून शेतकऱ्यांच्या उरावर येऊन पडणार आहे.

### सहकारातील बोक्यांची चुळबुळ

या सगळ्या प्रकारात डॉ. कूरियन यांचा संस्थात्मक स्वार्थ उघड आहे, पण त्यांची दृष्टी निदान, वैयक्तिक स्वार्थाची नाही. पण, त्यांच्या कृपाछत्राखाली देशभर पसरलेले गावोगावचे, जिल्ह्याजिल्ह्यातील दूध सोसायट्यांचे चेअरमन मात्र हादरून गेले आहेत, ते आपला फायद्याचा धंदा बुडणार या भीतीने. पर्यायी दूधसंकलन-व्यवस्था सुरू झाली तर सोसायटीला दूध घालेल कोण? ज्या सोसायटीत वारंवार दूध नासते आणि जिचे अधिकारीफक्त मालेमाल होतात त्या सोसायटीबद्दल, किरकोळ अपवाद वगळले तर, शेतकऱ्यांच्या मनात तिरस्कार आहे. त्याची या चेअरमन लोकांना पर्वा नाही. शेतकऱ्यांना कसेही मुठीत ठेवू, फक्त त्यांना दूध घालायला दुसरे साधन मिळता कामा नये, हा त्यांचा विचार आहे.

आणि त्याकरिता दुधाच्या आंदोलनाला विरोध करणारे हे शेतकऱ्यांचे शत्रू आपले साम्राज्य टिकविण्याकरिता आंदोलनाची भाषा करू लागले आहेत.

### लढाई अपरिहार्य

खुली अर्थव्यवस्था शेतकऱ्यापर्यंत पोहोचणार नसेल तर शेतकऱ्यांना पुन्हा एकदा नेहरूवादाच्या पुनरुत्थानाविरुद्ध, सर्वस्वपणाला लावून लढाई द्यावी लागणार आहे.

❖ ❖ ❖

खतांच्या भाववाढीबाबत शेतकरी संघटनेची भूमिका

# सूट सबसिडीचे नाही काम भीक नको, घेऊ घामाचे दाम

**— शरद जोशी**

ऑगस्ट महिन्याच्या शेवटी केंद्र शासनाने स्फुरद आणि पालाश खतांवरील सर्व नियंत्रणे रद्द केली आणि केवळ युरियावर नियंत्रण चालू ठेवून त्याची किंमत १० टक्क्यांनी कमी केली. परिणामतः स्फुरद खतांच्या किंमती दुपटीने वाढल्या तर पालाश खतांच्या किमती त्याहीपेक्षां जास्त भडकल्या.

ह्या किंमत वाढीमुळे जागोजागी शेतकऱ्यांत असंतोष निर्माण व्हावा हे साहजिक आहे. शेतकरी आंदोलनात जे कधी उतरले नव्हते, किंबहुना ज्यांनी शेतकरी आंदोलनाचा दुस्वास केला असे तालुका पुढारी, जिल्हा पुढारी 'शेतकरी संघटना आता काय करते आहे?' अशी आरडाओरड करू लागले आहेत. ज्या शासनाने हे निर्णय घेतले त्याच शासनातले संरक्षण मंत्री, गृहमंत्री महाराष्ट्रात आले म्हणजे त्यांच्यासमोर हा प्रश्न उठवण्याची कोणी हिंमत केली नाही, पण शेतकरी संघटनेने व शरद जोशींनी मात्र हा प्रश्न उठवला पाहिजे, आवश्यक तर आंदोलन केले पाहिजे असा कल्लोळ होत आहे. जळगांव, सांगली, कोल्हापूर, नाशिक इत्यादी जिल्ह्यांतील संघटनेच्या कार्यकर्त्यांना या सगळ्या प्रकाराचा बराच त्रास होऊ लागला आहे. एक वर्षापूर्वी छोटे शेतकरी सोडता इतरांसाठी वरखतांच्या भावात ३० टक्क्यांनी वाढ करण्यात आली. त्यानंतर, पुन्हा एकदा ही भाववाढ. आणि तरीही संघटना हा प्रश्न उठवत नाही ह्याचे कारण सर्व कार्यकर्त्यांना स्पष्ट होणे आवश्यक आहे.

संघटनेची या विषयावरील भूमिका काय आहे?

१) सूट सबसिडीच्या अर्थकारणाला संघटनेचा विरोध आहे. वरखतांवरील सबसिडी शेतकऱ्याला मिळत नव्हती. तिचा फायदा खत कारखाने, त्यांचा कच्चा माल पुरवणारे आणि शेतीमालाचे सर्व ग्राहक यांना होतो. सबसिडीच्या भावांत खते घेऊनही शेतकऱ्याचा उत्पादनखर्च भरून निघत नसेल तर ह्या सबसिडीचा लाभ शेतकऱ्याला नाही हे उघड आहे. खतावरील सबसिडी रद्द झाली पाहिजे आणि या रूपाने शासकीय तिजोरीची होणारी लूट थांबली पाहिजे ही संघटनेची स्पष्ट भूमिका आहे. नरसिंहराव सरकारने सबसिडी कमी करण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे टाकले पण ते अर्धवट टाकले आणि आता काढता पाय घेऊन ते पुन्हा एकदा जुन्या व्यवस्थेकडे जात आहे, याला संघटनेचा विरोध आहे.

युरियावरील सबसिडी वाढवून त्याची किंमत १० टक्क्यांनी कमी केली यालाही संघटनेचा विरोध आहे. खुल्या बाजारपेठेचे तत्त्वज्ञान संघटनेने मांडले आहे. शासनानेही त्याला तत्त्वतः मान्यता दिली आहे. शेतीच्या क्षेत्रात त्याला अपवाद केल्यामुळे विपरीत परिणाम होतील.

युरिया स्वस्त आणि इतर खते महाग अशा धोरणाने वरखतांच्या वापरातील संतुलन बिघडेल. केवळ युरियाच वापरण्याकडे शेतकऱ्यांचा कल होईल व जमिनीचे नुकसान होईल.

याखेरीज, खतांच्या भावाच्या बाबतीत छोटे मोठे शेतकरी हा सरकारने केलेला भेदभाव निरर्थक आहे. बहुतेक राज्यांत राज्य शासनाने तो अमलात आणलेलाच नाही आणि आता स्फुरद, पालाश खतांवरील सर्व नियंत्रणे काढल्यानंतर या भेदभावाला फारसा काही अर्थ राहत नाही. तेव्हा वरखतांची दुहेरी किंमतीची पद्धत रद्द करावी.

शेतीमालाला रास्त किंमत मिळाली पाहिजे हा शेतकरी संघटनेचा आग्रह कायम राहिला आहे, पण त्यासाठी शेतीत लागणाऱ्या वस्तूंच्या किमती कृत्रिमरित्या कमी करव्यात अशी भूमिका संघटनेने कधीही घेतली नाही. युरियाचा भाव वाढवायचा आहे वाढवा, विजेचा दर चढवायचा आहे चढवा, शेतीमालाचा उत्पादनखर्च काढतांना या चढत्या किंमती हिशेबात घ्या म्हणजे झाले अशी संघटनेची कायमची भूमिका आहे. गेल्या वर्षात खतांच्या वाढलेल्या किमती १९९२-९३ च्या खरीप

## वरखतांचा देशातील वापर

स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळेस वरखतांचा वापर भारतात जवळजवळ नगण्य होता. (६० हजार टन). हा वापर झपाट्याने वाढत आता जवळ जवळ १४० लाख टनावर गेला आहे.

वरखतांचा वापर प्रामुख्याने बागायती भागात आणि रब्बी पिकांकरिता होत असे, पण दिवसेदिवस खरिप पिकांकरिताही वरखतांचा वापर वाढत आहे. खरिप आणि रब्बी यातील वापराचे प्रमाण आज ४६:५४ असे आहे. वरखताचा प्रति हेक्टरी वापर प्रामुख्याने पांच राज्यात जास्त आहे. पंजाब (१५६ कि.) आंध्रप्रदेश (१२६ कि.) तामिळनाडू (११६ कि.) हरियाना (११४ कि.) आणि उत्तर प्रदेश (८६ कि.) सर्व भारतातील प्रति हेक्टरी सरासरी वापर फक्त ७२ कि. आहे. हाच आकडा पाकिस्तान (८९ कि.), बांगला देश (९९ कि.) युरोप (२०० कि.) असा आहे.

वरखतांचा वापर प्रामुख्याने भात, गहू, ऊस या तीन पिकांकरितां होतो. वरखतांचा वापर झपाट्याने वाढला तरी शेती उत्पादन त्या प्रमाणात वाढले नाही. वरखतांचा असंतुलित वापर हे त्याचे प्रमुख कारण आहे.

पिकांच्या आधारभूत किंमतीत हिशेबात घेतल्या गेल्या नाहीत असे म्हणायला आजतरी जागा दिसत नाही. जोपर्यंत बहुतेक अर्थव्यवस्था खुली होत नाही तोपर्यंत आधारभूत किंमतीच्या व्यवस्थेला स्थान राहणारच आहे. शेतीच्या निविष्ठांच्या किंमती त्यात पूर्णपणे धरल्या जाणे आज महत्त्वाचे आहे. उद्या देशांतर्गत आणि परदेशी व्यापार खुला झाला तर मग या सगळ्या हिशेबाला कांही अर्थ उरणार नाही, हेही तितकेच खरे आहे.

थोडक्यात, संघटनेचे टीकाकार सबसिडी वाढावी, नियंत्रणे वाढावी आणि खतांच्या किंमती उतराव्यात अशा मताचे आहेत. सरकारने उचलेली पावले मागे घ्यावीत अशी त्यांची मागणी आहे. तर शेतकरी संघटनेची भूमिका याच्या नेमकी उलट आहे. म्हणजे, सबसिडी संपवावी, नियंत्रणे उठवावी, वरखतांच्या किंमती खुल्या बाजारात ठरू द्याव्या, सरकारी धोरणाची दिशा योग्य आहे पण त्यांची अंमलबजावणी अधिक गतीने आणि तर्कशुद्धतेने व्हावी अशी संघटनेची भूमिका आहे. थोडक्यात, संघटनेचे टीकाकार सरकारला म्हणतात मागे हटा, संघटना सरकारला म्हणते अधिक वेगाने पुढे चला -

वरखतांचे सगळेच अर्थकारण आणि राजकारण अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे आहे. त्याचा सगळा इतिहास भूगोल आणि अर्थशास्त्र मांडण्याकरिता प्रबंध लिहावे लागतील, ते येथे काही शक्य नाही. तीथे काही

## वरखतांचा पुरवठा

चालू साली वापरल्या जाणाऱ्या खतापैकी २५ लाख टन वरखते आयात करावी लागतील. नत्र खतांच्या गरजांपैकी ८७% गरजा देशातील्या उत्पादनाने भागतात. युरियाच्या उत्पादनात देश जवळ जवळ स्वयंपूर्ण आहे. पालाश खतांच्या बाबतीत आपण सर्वस्वी परदेशातून आयात करण्यावर अवलंबून आहोत. वरखतांच्या वापराकरितां पेट्रोलियम उत्पादनातून तयार होणारे नाफ्ता, तेल किंवा तेलवायू वापरले जातात. त्याखेरिज, कोळशापासूनही वरखतांच्या उत्पादनाचा प्रयत्न झाला आहे. दिवसेदिवस तेलवायूचा वापर वाढण्याकडे कल आहे.

वरखतांचे कारखाने भांडवली दृष्ट्या अत्यंत खर्चिक प्रकरण आहे. या खर्चाचे प्रमाण सतत वाढत आहे. १९६९ साली वार्षिक ३ लाख टन उत्पादनाच्या कारखान्यास ६० कोटी रुपये भांडवली खर्च लागत होता, तर १९८० साली ८० लाख टनाच्या कारखान्यास ५५० कोटी रुपये भांडवली खर्च लागे. मार्च ९४ मध्ये होणाऱ्या टाटांच्या ३३ लाख टनाच्या कारखान्याचा भांडवलीखर्च १ हजार कोटी रुपयांवर जाईल.

वरखतांचे कारखाने प्रामुख्याने सार्वजनिक क्षेत्रात आहेत. हे कारखाने कुठे उघडायचे, काय आकाराचे उघडायचे याचा निर्णय राजकारण्यांच्या सोयीसोयीने लागतो आणि त्यात भ्रष्टाचाराचे प्रमाण खूप असते.

## वरखतांच्या किंमती

वरखतांच्या कारखान्यांच्या उत्पादन खर्चात खूपच तफावत आहे. वरखतासाठी कोणता कच्या माल वापरला जातो, तेल, वायू इत्यादि कच्या मालाची किंमत शासनाने काय ठरवली आहे, कच्या मालाच्या वाहतुकीचा खर्च काय, कारखान्याचा भांडवली खर्च कमी का जास्त आणि शेवटी कारखान्याची कार्यक्षमता यावर प्रत्येक कारखान्याचा उत्पादनखर्च अवलंबून आहे.

प्रत्येक कारखाना आपापल्या उत्पादनखर्चाप्रमाणे किंमती ठरवू लागला तर वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या कंपन्यांच्या वेगवेगळ्या मालांच्या भिन्न भिन्न किंमती होतील. आणि मोठा गोंधळ उडेल. सर्व देशभर सर्वसाधारणपणे एकसारख्या किंमती असणे योग्य आहे, असे शासनाने ठरवले.

शेतकऱ्यांनी वरखतांचा वापर अधिकाधिक करावा याकरितां शक्य तितक्या स्वस्त भावाने त्यांना वरखते पुरविणे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी करण्यासाठी आवश्यक होते. थोडक्यात, वरखतांची शेतकऱ्यांना चटक लागावी म्हणून त्यांच्या किमती स्वस्त ठेवण्याचे सरकारी धोरण राहिले. या धोरणाप्रमाणे १९८१ सालापासून ते गेल्यावर्षीपर्यंत वरखतांच्या किमतीत काहीही फरक करण्यात आला नाही.

प्रत्येक कारखान्याचा उत्पादनखर्च काढण्याची – व्याज, घसारा, कारखान्याच्या क्षमतेचा वापर आणि साडेचार टक्के फायदा एवढे लक्षात घेऊन एक मोठी क्लिष्ट पद्धत तयार करण्यात आली.

वरखतांच्या नियंत्रित किंमती आणि वाहतूक, वितरणखर्च तर दुसऱ्या बाजूस कारखान्याचा खर्च यातील तफावत सबसिडी म्हणून कारखान्यांना देण्याची पद्धत सुरू झाली.

सबसिडीची रक्कम वाढवून मिळावी याकरितां कारखान्यांनी कांही युक्त्या वापरल्या; उदाहरणार्थ, भांडवली खर्च फुगवणे. एकूण, वरखतांच्या कारखान्यात, विशेषतः नव्या कारखान्यात कार्यक्षमता जोपासण्यास काही उत्तेजन राहिले नाही.

परिणाम असा झाला की १९८१ सालापासून खतांच्या किंमती वाढल्या नाहीत, खतांचा वापर दुपटीवर गेला, तर सबसिडीची रक्कम याच काळात ५०५ कोटीवरून ५००० कोटींच्या आसपास जाऊन पोचली.

इतकी सबसिडी देऊनसुद्धां स्वस्त केलेले खतांचे भारतातील भाव जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा वरचढ आहेत. १ किलो वरखते खरीदण्याकरिता किती किलो गहू किंवा भात द्यावा लागतो असा हिशोब केला तरीसुद्धा जगातील इतर देशांपेक्षा आपल्याकडे वरखते महागडी आहेत - अगदी पाकिस्तान आणि बांगला देशाच्या तुलनेनेसुद्धा. (शेतकरी संघटक, २१ ऑगस्ट १९९१ पाहा)

महत्त्वाच्या मुद्द्यांचाच परामर्श घेता येईल.

आपल्या देशातील वरखतांचा वापर, वरखतांचा पुरवठा व त्यांच्या किंमती यांचा सखोल अभ्यास केला तर काय दिसते?

**शेतीवरील परिणाम**

अकार्यक्षम कारखाने, भ्रष्टाचार, महागडी वरखते, आणि वर शेतकऱ्यावर भले उपकार करत असल्याचा आव अशी ही सध्याची व्यवस्था आहे. शेतकऱ्यांना वरखतांच्या वापराची चटक लागली त्याबरोबर संकरित आणि इतर विकतचे बियाणे तो घेऊ लागला. सुरवातीच्या काळात उत्पादनात चांगली वाढही झाली. देश तथाकथित स्वयंपूर्णतेच्या आसपास पोचला. उत्पादनाच्या या वाढीचे मोठे श्रेय वरखतांमुळे झालेल्या उत्पादकतेला नाही. वरखते उपलब्ध झाल्यामुळे पूर्वीची पाळीपाळीने वावरे पडीत ठेवण्याची व त्यातून जैविक खते तयार करून घेण्याची पद्धत मागे पडली आणि सगळे शेतकरी सरसकट सगळी जमीन प्रत्येक वर्षी आणि प्रत्येक हंगामात वापरात आणण्याचा शक्यतो प्रयत्न करू लागले. वरखतांमुळे अधिक जमीन लागवडीखाली आली आणि उत्पादन वाढले.

नवीन जमीन लागवडीखाली येण्याचे जसे कमी पडले तसतसे उत्पादन वाढीची गतीही मंदावली. वर खतांचा बेहिशेबी आणि असंतुलित वापर यांमुळे जमिनींची जैविक शक्ती झपाट्याने खालावू लागली.

याउलट, वरखतांचा मोठा वापर करणाऱ्या पाच सहा राज्यातच गहू, भात आणि ऊस यांचे उत्पादन अशा पातळीस पोचले की १९७५-७६ च्या सुमारास उत्पादन वाढवल्याने पैशातील उत्पन्न कमी होते अशी व्यस्त परिस्थिती निर्माण झाली.

वरखतांच्या सहज उपलब्धीमुळें आणखी एक भयानक दुष्परिणाम घडला आहे. रासायनिक शेतीला पर्यायी तंत्रज्ञान उभे करण्याकडे सर्वस्वी दुर्लक्ष झाले आणि उद्या पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा कमी किंवा बंद पडला तर शेती करायची कशी या प्रश्नाचे समर्पक आणि व्यापक उत्तर कोणीच देऊ शकत नाही.

खत पुरवठ्याच्या एकूण व्यवस्थेतील दलदल संपवणे, या व्यवस्थेचा सरकारी तिजोरीवरील बोजा काढून टाकणे, शेतीमालाला रास्त भाव मिळवून देणे आणि दूरवरच्या भविष्यात पेट्रोलियम पदार्थांच्या अभावातही स्वयंभू शेती होऊ शकेल या उद्दिष्टांसाठी काही तातडीच्या उपाययोजना आवश्यक आहे.

१) कारखान्यांतील गैरकारभार दूर करण्यासाठी कारखान्यांना बाजारपेठेतील स्पर्धेला तोंड द्यावयास लावले पाहिजे. त्यासाठी सर्व नियंत्रणे दूर केली पाहिजेत.

२) नियंत्रण दूर करणे याचा परिणाम देशी वरखतांच्या बाबतीत तरी किंमती भडकण्यात होईल असे मुळीच नव्हे. लक्षणे अशी दिसतात की नियंत्रण काढून घेतल्यास भाव प्रत्यक्षात खाली येतील.

३) भाव उतरोत किंवा भडकोत वरखतांच्या नैसर्गिक किंमती लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी वरखते वापरायची किंवा नाही, किती वापरायची आणि काय प्रमाणात वापरायची त्याचा निर्णय घेतला पाहिजे. वरखते महाग झाली तर आपला शेतजमीनीतील एका हिश्श्याचा वापर पर्यायी खते शेतावर तयार करण्याकरितां केला पाहिजे. तसेच, गहू, भात, ऊस यासारखी, वरखते ओरपणारी पिके घेण्याबद्दल फेरविचार केला पाहिजे, तरच उद्याच्या पेट्रोलियम विरहित जगाला तोंड देण्याची शेतकऱ्यांची तयारी होऊ शकेल.

या सगळ्या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने केंद्र शासनाच्या खुल्या धोरणाला पाठिंबा दिला आहे. त्या सरकारचे पाय आज डगमगू लागले आहेत. शेतीचे अर्थकारण ज्यांना कधी समजलेच नाही असे संधीसाधू पक्ष, संस्था आणि संघटना या विषयावर काहीही हाकाटी करोत, संघटनेची भूमिका अगदी स्पष्ट आणि शुद्ध आहे.

■ ■ ■

# माजघर शेती प्रदर्शन रद्द

महाराष्ट्रव्यापी माजघर शेती प्रदर्शनासंबंधी शेतकरी संघटकमधून दिलेल्या निवेदनाला मिळालेला प्रतिसाद अत्यंत अल्प प्रमाणात मिळाला असल्याने या प्रदर्शनासाठी आवश्यक असलेला प्रचंड खर्च लक्षात घेता हे प्रदर्शन भरविण्याचे तूर्त रद्द करण्यात आले आहे. या निर्णयामुळे या प्रदर्शनात भाग घेण्याची तयारी करणाऱ्या मायबहिणींचा विरस होईल, पण त्याला इलाज नाही. पुढे कधी असे प्रदर्शन भरेल त्यामध्ये भाग घेण्यासाठी आपल्या माजघरातील पदार्थांमध्ये वेगवेगळे प्रयोग करून त्यामध्ये गुणात्मक सुधारणा घडवून आणणे तोपर्यंत शक्य होईल.

प्रयोग तपासणार कसे? माजघर शेतीत तयार झालेले पदार्थ 'व्यापार शेती' करणाऱ्या आपल्या भावांच्या साहाय्याने बाजारात आणा. त्यांचे पॅकिंग, आकार, चव, रंग इत्यादिसंबंधी ग्राहकांच्या प्रतिक्रिया अजमावून आवश्यक ते बदल घडवीत सुधारणा करा.

हे करीत असतांना व्यवहार विसरू नका. तुमचा पदार्थ बाजारात जातांना त्यावर त्याची रास्त किंमत जरूर लिहा. त्यातून झालेला नफा पुढे जेंव्हा केव्हा प्रदर्शन भरेल त्यावेळी आपले पदार्थ, बहुधा सुधारलेल्या रूपात त्या प्रदर्शनात ठेवण्यासाठी येणारा खर्च भागविण्यास उपयोग ठरेल.

माजघर शेतीत गुंतलेल्या सर्व मायबहिणींना शुभेच्छा.

**माजघर शेती प्रदर्शन कार्यालय, आंबेठाण**

### शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती :

# प्रश्नावली संबंधी

६ सप्टेंबर १९९२ च्या शेतकरी संघटकच्या अंकात दिलेली ही प्रश्नावली भरून मोठ्या प्रमाणात शेतकरी संघटकच्या कार्यालयाकडे येत आहे.

प्रश्नावलीची उत्तरे व्यवस्थित भरून पाठविणारांस किंवा त्यांनी सुचविलेल्या पत्त्यावर 'शेतकरी संघटक' एक वर्ष विनामूल्य पाठविण्याचे ठरले आहे. पण, ही प्रश्नावली भरून पाठविणाऱ्या बहुसंख्य शेतकऱ्यांनी त्यासंबंधी काही सूचना केलेली नाही.

ठरविल्याप्रमाणे अंक पाठविणे शक्य व्हावे म्हणून प्रश्नावली आधीच भरून पाठविलेल्यांनी खालील माहिती पोस्टकार्डावर लिहून त्वरीत पाठवावी ही विनंती.

१) शेतकरी संघटकचे वर्गणीदार आहात का? असल्यास वर्गणीदार क्रमांक काय?

२) या योजनेअंतर्गत पाठविण्यात येणार अंक कोणत्या पत्त्यावर पाठवायचा?

– शेतकरी संघटक, अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)

# स. न. वि. वि. ........

## शेतीवरील कर

... काळे धन बाहेर काढण्यासाठी चलैय्या समितीने शेतीवर आयकर बसविण्याची शिफारस केली. पण त्यातून जे शेतकरी खरोखरच शेतीवर अवलंबून आहे त्यांना सूट दिली आहे. सर्वच शेतकऱ्यांना आयकर लावावा अशी शिफारस का केली नसेल?

२/९/१९९२ **अमृत नारायण शिंदे**
ब्राह्मणगाव (परभणी)

.........

शेतकऱ्यावर कर लावला जात नाही तो शासनाच्या आणि शासकीय धोरणाच्या सोईसाठी. बिगर शेतकऱ्याच्या शेतकी उत्पन्नावर कर लावावा ही सूचना चलैय्यांनी कां केली हे समजणे कठीण आहे; कारण आजही बिगर शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नावर कर आहेच. तेव्हा सध्या हा विषय बाजूला ठेवण्यात आला आहे, असे दिसते. परंतु कालच नियोजन मंडळाच्या उपाध्यक्षांनी शेती आणि पाणी यावर कर जावून ३५० अब्ज रू. उभे करण्याचे आवाहन राज्यांना केले आहे. आज ना उद्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर कर येणार आहे. तो लवकर येवो एवढीच इच्छा.

५/९/९२ **शरद जोशी**

## चतुरंग शेतीला पर्याय नाही

... ९ ऑगस्ट १९९२ पासून शासनाने टी. व्ही. वरून कार्यक्रम दाखवून व जि. प. च्या शाळांतील मुलांमुलींच्या मिरवणुका काढून 'चले जाव' चळवळीचा उदो उदो चालवला आहे.

आता आपल्यालाही, ज्या गांधीजींनी इंग्रजांना घालवून देण्यासाठी 'भारत छोड दो।' असा इशारा दिला त्या महात्माजींच्या विकासप्रणालीला अनुसरून 'चतुरंग शेतीच्या' कार्यक्रमास चालना दिली पाहिजे.

५० पेक्षा कमी कामगार असलेल्या उद्योगाची सुरूवात करण्यास आता परवानगीची जरूरी असणार नाही असे असले तरी त्या संबंधीच्या परिपत्रकात "सध्या अस्तित्वात असलेल्या प्रक्रियाउद्योगांवर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी काही अटी पाळणे आवश्यक असेल'' असेही म्हटले आहे.

शासन कापसाचे रेचे बसविण्यास किंवा ऊसापासून गूळ, खांडसरी बनविण्यास परवानगी देणार नाही असे मला वाटते. फक्त छोट्या छोट्या डाळ मिल, तेलघाण्या किंवा मिरचीमसाला पावडर करण्याच्या किरकोळ उद्यागांनाच परवाने मिळतील. म्हणून 'नेहरू प्रणाली छोड दो, इन्किलाब झिंदाबाद' अशा घोषणा देऊन संघर्ष करून आपला व्यापार आपण हाती घेतला पाहिजे.

१०/८/१९९२ **डॉ. केशव पंडीतराव देशमुख**
डोंगरकिन्ही (अकोला)

.........

चतुरंग शेतीच्या कार्यवाहीसाठी आंदोलनापेक्षां अगदी वेगळ्या तऱ्हेची कर्तबगारी आणि मानसिकता आवश्यक आहे. ५० पेक्षां कमी कामगार असलेल्या धंद्यास पूर्ण परवानगी मिळाल्यानंतर त्यातील किरकोळ त्रुटींबद्दल अटून राहण्यात फारसा मतलब नाही. कापसाच्या रेच्यांबद्दल काही निर्णय होईल अशी आशा आहे. जिल्ह्याजिल्ह्यातून आणि गांवागावातून शेतीतील आर्थिक प्रश्नांची जाण असलेले कार्यकर्ते आता आपल्या उद्योजकतेचे प्रात्यक्षिक दाखवतील व शेतकरी आंदोलन राजकीय नाटक नव्हते; शेतकरी म्हणून सन्मानाने जगणाऱ्यांचे ते आंदोलन होते हे सिद्ध करून दाखवतील अशी आशा आहे.

२२/८/९२ **शरद जोशी**

## दारू दुकान बंदी

... संपूर्ण गडचिरोली जिल्ह्यातील दारूची दुकाने व परमिट रद्द करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने २९ जुलैला जाहीर केला. गेली ४ वर्षे गडचिरोली जिल्ह्यात सुरू असलेल्या दारूमुक्ती आंदोलनाचा हा विजय आहे.

आदिवासी जनता व विशेषतः महिलांच्या मागणीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र शासनाने हे अभिनंदनीय पाऊल उचलले आहे.....

गडचिरोली जिल्ह्यातील या आंदोलनाचा व विजयाचा महाराष्ट्रातील इतर भागात परिणाम झाल्यास अधिक व्यापक चळवळ उभी राहू शकते.

८/८/१९९२ **डॉ. अभय बंग,**
गडचिरोली जिल्हा दारू मुक्ती संघटना
(परिपत्रकावरून)

.........

गडचिरोली जिल्ह्यातील दारू दुकानाबद्दल झालेला निर्णय लगेच अंमलात येणारा नाही असे दिसते. १८ ऑगस्ट रोजी माझी मुख्यमंत्र्यांशी भेट झाली त्यावेळी महाराष्ट्रभरच्या दारू दुकानबंदी संबंधीच्या प्रस्तावाविषयीही चर्चा झाली. शेतकरी महिला आघाडीच्या मागणीला तत्त्वतः मान्यता पूर्वीच दिलेली असली तरी त्यासंबंधी शासकीय अध्यादेश काढणे आताच शक्य होणार नाही असे त्यांनी सांगितले. गडचिरोलीतील दारू दुकानाबद्दल मंत्रीमंडळाचा निर्णय असला तरी तेथील आमदार आणि त्यांचे पाठीराखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे ३१ मार्च १९९३ पर्यंत या निर्णयाची कार्यवाही स्थगित करण्याची मागणी केली व मुख्यमंत्र्यांनी ती मान्य केला असे दिसते. याबद्दल तुमची पुढची कार्यवाही काय? कळण्यास मी उत्सुक आहे.

महाराष्ट्रभरच्या दारू दुकान बंदीबाबत आम्ही तडजोड स्वीकारण्याची तयारी दाखवली आहे. पंचायतींनी गावात दुकान उघडण्याबद्दल पूर्वी अनुमती दिलेली आहे. आणि त्यानंतर दारू दुकान बंदीचा ठराव केला आहे हे पाहता दुकानच्या लायसेंसची चालू मुदत संपल्यावर ही दुकाने बंद झाली तरी चालेल अशी आमची तयारी आहे.

दुकानाची लायसेंस पुढाऱ्यांना देण्याऐवजी लिलावाने देण्याचा निर्णय झाला आहे असे कळते. त्याचाही आपल्या एकूण मागणीवर काही परिणाम राहणार आहे असे वाटते.

५/९/९२ **शरद जोशी**

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कर्जमाफीचा फायदा का नाही?

....केंद्र शासनाच्या कर्जमाफी योजनेचा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्या योजनेतील शासनाच्या अटींमुळे लाभ मिळत नाही. शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनीही या जिल्ह्याकडे दुर्लक्ष केले. एकूणच प्रकरणात शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

२८/७/९२ **श्री. भा. के. वारंग,**
तुळसुली (सिंधुदुर्ग)
दै. सिंधुदुर्ग समाचार,

.........

मी सिंधुदुर्ग जिल्ह्याकडेच नव्हे तर भारतातील ६०० पैकी बहुतेक जिल्ह्यांकडे दुर्लक्ष केले

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st September, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
September 21, 1992

To

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

आहे. माझी ताकद अत्यंत मर्यादित आहे. सत्य काय आणि शेतकऱ्यांचे हित काय, हे होईल तितक्या जिवाच्या आकांताने सांगायचे एवढेच मी करू शकतो. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आवश्यक ते अर्थशास्त्र आणि आंदोलनाचे तंत्र, दोन्हीही मी दिले. दुर्दैवाने, शेतकऱ्यांचा विश्वास पटला नाही. आणि फार थोड्या म्हणजे चार पाच लाख शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीचे अर्ज भरले. राजकीय निवडणुकांत कर्जमुक्तीच्या बाजूने मतदान करण्याऐवजी जातीपातीच्या नाहीतर अयोध्येच्या रामाच्या आधाराने शेतकऱ्यांनी मतदान केले. आंदोलनाची ही अवस्था पाहता मिळालेले यश काही नगण्य नाही, असे समाधान मी मानतो.

सिंधुदुर्ग जिल्ह्यांत सरकारी व्याख्येप्रमाणे दुष्काळ होत नाही. आणि कर्जमुक्तीचे अर्जही जवळजवळ कुणीच भरलेले नाहीत, तेव्हा कोणालाच त्याचा फायदा झाला नसावा हे साहजिक आहे. त्याबद्दल आपली नाराजी असावी हेही योग्य आहे, पण याबद्दल मला दूषण का? शेतकऱ्यांना कोणाला दोष द्यायचाच असेल तर शेतकरी संघटना सोडून इतर ज्यांच्यामागे ते गेले त्यांना दोष दिला पाहिजे.

८/९/९२ **शरद जोशी**

## रासायनिक खतांचा त्याग

मी एक तरूण पदवीधर शेतकरी आहे. आमच्या ४० एकर जमिनीत पूर्वी पंचवीस हजारांची रासायनिक खते घालायचे. घरच्या लोकांचा विरोध सहन करून मी रासायनिक खते न वापरता शेती करण्याचे ठरवून ८ हजार रूपयांच्या शेळ्या घेऊन बसवू लागलो. २ हजार रूपयांचे शेणखत घातले. आधी दरवर्षी रासायनिक खते घालून कापसाच्या पिकात आम्ही पहिल्या पाचात राहत होतो तरी गेल्या वर्षी खरीप व रब्बी यांच्यातून मिळालेला निव्वळ नफा हा कापसापेक्षा जास्त झाला.

माझे घर ब्राह्मणाचे, सोवळ्या-ओवळ्याचे असले तरी मी देवाची पूजा वगैरे करीत नाही. मी बळीराजाची मूर्ती तयार करून घेणार असून ती, शेतकरी संघटनेची प्रतिज्ञा घेऊन, जयघोष करून जमिनीतून वर काढून साग्रसंगीत आमच्या देवघरात इतर देव बाजूला काढून प्रस्थापित करणार आहे. त्याला खादीचे धोतर नेसवून ठेवणार आणि त्याचीच नित्यनेमाने पूजा करणार.

२९/८/१९९१ **अजित केसराळीकर**
केसराळी (नांदेड)

.........

मला वाटते की, 'सीता शेती' आणि पर्यायी शेती तंत्रज्ञान या विषयावर तुझा काही गैरसमज झाला आहे. रासायनिक खते वापरू नका, त्याऐवजी नैसर्गिक खते वापरा एवढेच सांगायचे असते तर त्याकरितां 'सीता शेती' च्या प्रयोगाची आवश्यकता नव्हती. या विषयावर वर्ध्याच्या बैठकीत मी तपशीलवार बोललो होतो. (पहा : शेतकरी संघटमधील 'चतुरंग शेती' हा लेख)

बळीराजाच्या पूजेची तुझी कल्पना पाहून गंमत वाटली. अशा प्रतिकात्मक पूजा वामन आणि त्याचे वारसदार यांच्या होतात. बळीराजाचे चालणारे पूजन हे क्षणाक्षणाने आणि कणाकणाने सतत चालणारी प्रक्रिया आहे.

डोके शांत ठेवावे, आपला अभ्यास आणि इतर कार्यक्रम उत्कृष्ट पार पाडावे, म्हणजे योग्य वेळी बळीराजाची सेवा करायचे सामर्थ्य येईल.

५/९/९२ **शरद जोशी**

## उत्पन्नाची उलटी गंगा

शेतीत घाम गाळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमागे भारतामध्ये अन्नधान्य आणि दूध यांच्या उत्पादकतेमध्ये १९५१ ते १९८८ या काळात अनुक्रमे ३.८३ टक्के व २.०८ टक्के वाढ झाली. पण याच काळात या घाम गाळून उत्पादकता वाढविणाऱ्यांच्या दरडोई उत्पन्नात मात्र २.९३ टक्क्यांनी घट झाली आहे. कर्नाल येथील राष्ट्रीय दूध व्यवसाय संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी भारतातील शेतीक्षेत्राच्या आर्थिक परिस्थितीचे समग्र विश्लेषण केल्यानंतर हा निष्कर्ष काढला आहे. अजूनही शेतीक्षेत्रावरच अवलंबून असणारी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ७३ टक्के आहे तर राष्ट्रीय नक्त उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा हिस्सा मात्र १९५१ साली ५३ टक्के होता तो १९८८ साली २८ टक्क्यांपर्यंत घसरला. या संपूर्ण काळात दुधाच्या उत्पादनात दरसाल सरासरी ४.८५ टक्क्यांनी तर अन्नधान्याच्या उत्पादनात ६.४३ टक्क्यांनी वाढ झाली. देशाच्या खाण्यापिण्याची सोय करीत असतांनाच शेतीक्षेत्रातील रोजगारही दरसाल सरासरी १.५६ टक्क्यांनी वाढत राहिला.

आणि तरीही शेतीक्षेत्रातील गरीबी आणि बेकारी वाढतच आहे असे या अभ्यासकांनी म्हटले आहे.

(इकॉनॉमिक टाईम्स्, १६ सप्टेंबर १९९२)

श्रमांची उत्पादकता वाढली, उत्पादन वाढले, रोजगार निर्मितीही झाली तरी शेतीचा उत्पन्नातील हिस्सा कमी होत आहे, शेतीत घाम गाळणाऱ्यांचे दरडोई उत्पन्न घटत आहे आणि शेतीवर अवलंबून असणारांची संख्यामात्र जवळजवळ स्थिर राहात आहे. ही 'उलटी गंगा' का? याचे एकमेव कारण, गेली चाळीस वर्षे शेतकऱ्यांच्या मानगुटी बसलेले नेहरूवादाचे भूत आहे. हे भूत जोपर्यंत शेतकऱ्यांच्या मानगुटीवरून उतरत नाही तोपर्यंत ही गंगा अशी उलटीच वाहात राहाणार.

●●●

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**